महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ १४ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १३९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## लक्षवेधी

## ठाण्यात मतदारसंख्येत वाढ

### ४ लाख २१ हजार मतदार महिलांची निर्णायक वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. १३ :** नुकतेच ठाणे पालिका निवडणुकीसाठी प्रभाग आरक्षण जाहीर झाले आहे. त्यानंतर आता निवडणुकीच्या कामांच्या हालचालींना वेग आला आहे. अशातच ठाणे पालिका क्षेत्रात तब्बल चार लाख २१ हजार २५६ नवीन मतदारांची भर पडली आहे. नव्या मतदारांपैकी महिला मतदारांची वाढ सर्वाधिक असून, त्यांची संख्या तब्बल दोन लाख २४ हजार ७४३ ने वाढली आहे. त्यामुळे ठाणे पालिका क्षेत्रातील मतदारांची संख्या १६ लाख ४९ हजार ८६२ इतकी झाली आहे.

आगामी ठाणे पालिका निवडणुकीचे पडघम वाजण्यास सुरुवात झाली आहे. पालिकेच्या निवडणूक विभागाकडून देखील कामाला वेग दिला असल्याचे दिसून येत आहे. अशातच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार नोंदणीचा आढावा घेतला असता, ठाणे पालिका क्षेत्रात तब्बल चार लाख २१ हजार २५६ नवीन मतदारांनी वाढल्याचे दिसून येत आहे. २०११ च्या लोकसंख्येच्या (१८ लाख ४१ हजार ४८८) आधारावर प्रभागरचना करण्यात आली असून, त्यावेळचा जुना पॅटर्नच कायम ठेवण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्षात ठाण्याची लोकसंख्या आता २५ लाखांच्या पुढे गेली आहे. त्यामुळे अनेक प्रभागांमध्ये मतदारसंख्येत झालेली वाढ स्पष्टपणे जाणवत आहे. विशेषतः घोडबंदर, दिवा आणि नव्याने विकसित होणारे परिसर येथे गेल्या काही वर्षांत लोकसंख्येची झपाट्याने वाढ झाली आहे. नव्या गृहसंकुलांमुळे या भागांतील मतदारसंख्या झपाट्याने वाढत असून, काही प्रभाग आता ५५ ते ६० हजार मतदारांपर्यंत पोहोचले आहेत.

### मुंब्रा रेल्वे अपघात प्रकरणी

## अभियंत्यांचे अटकपूर्व जामीन फेटाळले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मुंब्रा येथील रेल्वे अपघात प्रकरणी मध्य रेल्वेच्या दोन अभियंत्यांविरोधात ठाणे लोहमार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या अभियंत्यांनी ठाणे न्यायालयात वकिलांमार्फत अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला होता. हा अर्ज न्यायालयाने गुरुवारी फेटाळला. त्यामुळे अभियंत्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. मध्य रेल्वे मार्गावरील मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळील वळण मार्गावर कसारा येथून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) रेल्वे स्थानकाच्या दिशेने वाहतुक करणारी आणि सीएसएमटी येथून कर्जतच्या दिशेने वाहतुक करणारी रेल्वेगाडी एकाचवेळी आल्यानंतर अपघात झाला होता. 'व्हिजेटीआय' संस्थेने दिलेल्या अहवालानंतर मध्य रेल्वेचे वरिष्ठ विभागीय अभियंता समर यादव आणि साहाय्यक विभागीय अभियंता विशाल डोळस यांच्यासह इतरांविरोधात ठाणे लोहमार्ग पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.



## जिल्हा परिषदेत मविआला २० पेक्षा जास्त जागा मिळतील - खा. बाळ्यामामा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** महाविकास आघाडी म्हणजे उद्धवसेना, मनसे, कम्युनिस्ट पक्ष आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस या सर्व पक्षांच्या एकत्रित शक्तीमुळे ठाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांवर सत्ता येणार, असा विश्वास खासदार सुरेश म्हात्रे यांनी व्यक्त केला. मुरबाडमध्ये आयोजित संपर्क दरबारात लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय करण्यासाठी खासदार बाळ्यामामा म्हात्रे दुसऱ्यांदा आले होते, यावेळी ते पत्रकारांशी संवाद साधताना बोलत होते. आम्हाला शहापूर आणि भिवंडी तालुक्यांत अधिक जागा मिळतील. मुरबाड तालुक्यातील ८ जिल्हा परिषद आणि १६ पंचायत समितीच्या जागांवर आम्ही लढणार आहोत. त्यांनी पुढे सांगितले की, सुभाष पवार यापूर्वी शिंदेसेनेत होते. त्यांनी माझ्या विरोधात काम केले. उमेदवारीसाठी राष्ट्रवादीत आले आणि त्यांच्यासाठी आम्ही कामही केले. पण पवार यांची राजकारणात सत्ता नसली की बेचैनी वाढते. मात्र, महाविकास आघाडी ठाणे जिल्हा परिषदेत वीसपेक्षा जास्त जागा जिंकून सत्तेत येईल, याची मला खात्री आहे. मात्र, महाविकास आघाडी ठाणे जिल्हा परिषदेत वीसपेक्षा जास्त जागा जिंकून सत्तेत येईल, याची मला खात्री आहे.

# अखेर सुभाष पवारांच्या हाती कमळ !

## जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुभाष पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर : मुरबाड विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवण्यासाठी शिवसेनेतून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेलेले आणि भाजपचे आमदार किसन कथोरे यांच्याविरूद्ध निवडणुक लढवलेले सुभाष गोटीराम पवार यांनी गुरूवारी किसन कथोरे यांच्याच पुढाकाराने भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला.**

ठाणे जिल्ह्यात मुरबाड मतदारसंघात एकेकाळी काँग्रेस आणि नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. सुरूवातीला शांताराम घोलप आणि पुढे गोटीराम पवार यांच्या माध्यमातून हा मतदारसंघ काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात राहिला. गोटीराम पवार हे चार टर्म आमदार होते. त्यानंतर त्यांचे पुत्र सुभाष पवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले. काही वर्षांपूर्वी सुभाष पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधून शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांना शिवसेनेने जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष पदही दिले होते. त्यांच्याकडे भिवंडी लोकसभा सहसंपर्कप्रमुख पदही होते. मात्र गेल्या वर्षातल्या विधानसभा निवडणुकीत ही जागा भाजपला गेल्याने इच्छुक असलेले सुभाष पवार यांची कोंडी झाली. पवार यांनी महाविकास आघाडीची दारे यापूर्वीच ठोठावली होती. राजकारणात कोणीही कोणाचा कायमचा शत्रू अगर मित्र नसतो हे सुभाष पवारांच्या भाजपा प्रवेशामुळे पून्हा एकदा सिद्ध झाले असून मुरबाड मधील राजकीय समिकरणे बदलली जाणार आहेत. मुरबाड मधे आता विरोधी पक्षच राहिला नसला असल्याचे राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. या प्रवेशानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना सुभाष पवार म्हणाले की मी आज माझ्या सर्व सहकार्यासह भाजपात प्रवेश करत आहोत. यापुर्वी आम्ही भाजपाच्या विरोधात लढलो पण आता पुर्ण मुरबाड एकतर्फी भाजपमय झाला आहे. मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या विकासाच्या धोरणाकडे बघून आम्ही विकासासोबत जाण्याचा निर्णय घेतला असून वनमंत्री गणेश नाईक, कपिल पाटील, आमदार किसन कथोरे यांचे त्यांनी विशेष आभार मानले आहेत. दरम्यान त्यांच्या या प्रवेशानंतर ते आमदार किसन कथोरे की माजी मंत्री कपिल पाटील गटाकडे झुकतात हा येणारा काळच ठरवणार असून निष्ठावंत कार्यकर्त्यांची मात्र गोची झाली असून त्यांच्यात नाराजीचा सुर दिसून येत आहे.




**माझ्या नेतृत्त्वावर विश्वास ठेवून ठाणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री.सुभाष गोटीराम पवार यांनी मुरबाड तालुक्यातील आपल्या अनेक कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. स्थानिक विकासकामांबाबत आणि सर्वसामान्य माणसांच्या हितासाठी हा निर्णय घेतला असून, त्यामुळे मुरबाड विधानसभा मतदारसंघात भाजपचे बळ अधिकच वाढेल ही अपेक्षा आहे. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्व एकत्र येऊन तालुक्यातील विकासकार्ये अधिक गतिमानपणे पार पाडू असा विश्वास व्यक्त करतो. ■ आ. किसन कथोरे**

**विविध विकासकामांना गती देण्यासाठी भाजपात प्रवेश केला. अनेक वर्षे भाजप विरोधात काम केले. निवडणुकही लढलो. पण परिसराचा विकास करण्यासाठी भाजपात जाण्याचा निर्णय घेतला. भाजपला मजबूत करण्याचे कामकरणार, अशा भावना यावेळी सुभाष पवार यांनी व्यक्त केल्या.**

### शिवसेनेलाही मोठा धक्का

**सुभाष पवार यांच्या रूपाने मुरबाड तालुक्यात शिवसेनेची ताकद वाढली होती. आता सुभाष पवार भाजपात गेल्याने ते शिवसेनेविरूद्ध मैदानात उतरण्याची शक्यता आहे. पवार यांच्यासह अनेक माजी सभापती, जिल्हा परिषद, पंचायत समिती, बाजार समिती सदस्यांनीही भाजपात प्रवेश केला आहे. त्यामुळे शिवसेना कुणाला संधी देते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. यावेळी माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आमदार किसन कथोरे, जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.**



## २७ गावांसाठी पाणी आराखडा तयार करा

### आमदार राजेश मोरे यांचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली -** गेल्या काही महिन्यांपासून एमआयडीसीकडून २७ गाव, डोंबिवली एमआयडीसी विभागाला कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. याविषयी नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. संतप्त नागरिकांनी गेल्या आठवड्यात एमआयडीसीवर मोर्चा काढला होता. या पाणी समस्येची गंभीर दखल घेऊन कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी एमआयडीसीच्या अभियंत्यांसह बारवी येथून पाणी पुरवठा होणाऱ्या जांभूळ येथील जलशुध्दीकरण केंद्राची गुरूवारी पाहणी केली. आणि अधिकाऱ्यांना २७ गाव, एमआयडीसी परिसराला दररोज मुबलक पाणी पुरवठा होईल यादृष्टीने नियोजन आणि सविस्तर आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले.


पुरेसा पाऊस पडूनही मागील काही महिन्यांपासून डोंबिवली जवळील २७ गाव, डोंबिवली एमआयडीसी निवासी, औद्योगिक क्षेत्र परिसरात कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. नियमित सकाळी येणारे पाणी अनेक वेळा येत नसल्याच्या रहिवाशांच्या तक्रारी आहेत. यापूर्वी एमआयडीसीत चोवीस तास मुबलक दाबाने पाणी पुरवठा होत होता. त्यामुळे रहिवाशांनी एमआयडीसीत घर घेण्याला प्राधान्य दिले. आता पाणी येत नसल्याने रहिवाशांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

बारवी धरणातून दररोज मुबलक पाणी उपसा होऊन तो शहरांना केला जात असताना, मग २७गाव, एमआयडीसी परिसराला कमी दाबाने पाणी पुरवठा का होतो याविषयीची माहिती आमदार मोरे यांनी अधिकाऱ्यांकडून घेतली. अधिकाऱ्यांनी २७ गाव, एमआयडीसी परिसराला नियमित किती आणि कसा पाणी पुरवठा केला जातो याची तांत्रिक माहिती जलशुध्दीकरण केंद्रावर दाखवली. या दोन्ही भागांना नियमित पाणी पुरवठा होतो तर मग हा पाणी पुरवठा कमी दाबाने का होतो असे प्रश्न आमदार मोरे यांनी उपस्थित केले.

### देशातला पहिला प्रयोग...

# नव्या जिल्हा रुग्णालयावर हेलिपॅड

## जिल्हा रुग्णालयाच्या ताफ्यात एअर ॲम्बुलन्स




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नव्याने बांधण्यात येणाऱ्या जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीवर हेलिपॅड तयार केले आहे. रुग्णालय प्रशासनाने एअर अम्बुलन्स सेवा सुरू करण्यासाठी ही तयारी सुरू केली आहे. राज्य सरकार किंवा उद्योगांच्या सामाजिक दायित्वातून ही अम्बुलन्स उपलब्ध करण्याचा प्रयत्न सुरू असून दुर्घटना किंवा गंभीर रुग्णांसाठी ही अम्बुलन्स वरदान ठरणार आहे. ही सेवा सुरू झाल्यास हा जिल्हा सामान्य रुग्णालयातील देशभरातील पहिलाच प्रकल्प ठरणार आहे. तसेच एअर अम्बुलन्ससाठी प्रथमच इमारतीवर हेलिपॅड तयार करण्यात आला आहे, असा दावाही जिल्हा रुग्णालय प्रशासनाने केला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून जिल्हा रुग्णालयाच्या ताफ्यात एअर अम्बुलन्स आणण्याचा प्रयत्न असून लवकरच हे स्वप्न साकार होताना दिसेल, अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक कैलाश पवार यांनी दिली. ठाण्यात सुपर स्पेशलिटी, ठाणे जिल्हा रुग्णालयाचे काम अंतिम टप्प्यात असून, महिनाभरात त्याचे उद्घाटन होण्याची तयारी सुरू आहे. अत्याधुनिक सुविधांबरोबरच भविष्याचा वेध घेऊन एअर अम्बुलन्सची सुविधाही देण्यात येणार आहे. त्यासाठी नवीन रुग्णालय इमारतीवर हेलिपॅडची व्यवस्था करण्यात आली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून जिल्हा रुग्णालयाच्या ताफ्यात एअर अम्बुलन्स आणण्याचा प्रयत्न असून लवकरच हे स्वप्न साकार होताना दिसेल, अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक कैलाश पवार यांनी दिली. ठाण्यात सुपर स्पेशलिटी, ठाणे जिल्हा रुग्णालयाचे काम अंतिम टप्प्यात असून, महिनाभरात त्याचे उद्घाटन होण्याची तयारी सुरू आहे. अत्याधुनिक सुविधांबरोबरच भविष्याचा वेध घेऊन एअर अम्बुलन्सची सुविधाही देण्यात येणार आहे. त्यासाठी नवीन रुग्णालय इमारतीवर हेलिपॅडची व्यवस्था करण्यात आली आहे.

## बदलापूर नगरपरिषदेत आघाडीला वंचित, मनसेचीही साथ!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडी सज्ज झाली आहे. आघाडीने समविचारी पक्षांना एकत्र आणण्याचे प्रयत्न सुरू केले असून त्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि वंचित बहुजन आघाडीची साथ मिळाल्याने महाविकास आघाडीचा जनाधार मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याचा दावा आघाडीतील पदाधिकाऱ्यांनी केला आहे. कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेची निवडणूक ठाकरे गट, शरदचंद्र पवार गट आणि काँग्रेस हे पक्ष महाविकास आघाडीच्या नावाने एकत्र लढवणार आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित बहुजन आघाडी, आरपीआय (आर. के.), भारत मुक्ती मोर्चा आणि भारत राष्ट्र समिती यांनाही महाविकास आघाडीत सामावून घेण्यात येणार आहे. दरम्यान, महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पक्षालाही महायुतीत सामावून घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे शरद पवार गटचे प्रदेश सरचिटणीस अविनाश देशमुख यांनी सांगितले. खासदार बाळ्यामामा यांनीही येत्या दोन दिवसांत महाविकास आघाडीचे प्रभागनिहाय उमेदवार तसेच नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहीर होणार असल्याचे स्पष्ट केले.

# कल्याणचे तहसीलदार सचिन शेजाळ, गटविकास अधिकारी संजय भोये यांची बदली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण तहसील कार्यालयाचा चेहरामोहरा बदलून टाकणारे तहसीलदार सचिन शेजाळ यांना प्रोमोशन मिळून त्यांची बदली अमरावती जिल्ह्यात झाली आहे तर दुसरीकडे कल्याण पंचायत समितीचा कारभार सुरळीत व उत्तमरित्या हाताळणारे मृदुभाषी, शांत, संयमी गटविकास अधिकारी संजय भोये यांना पदोन्नती मिळाली असून ते पालघर जिल्ह्यात गेले आहे, त्यामुळे यांच्या बदलीने तालुक्यातून दोन चांगले अधिकारी जिल्ह्याबाहेर गेले आहेत. त्यामुळे उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

शासनाच्या ७कलमी १००दिवसांच्या कार्यक्रमातर्गत कार्यालयाचे सुशोभिकरण, कागदपत्र नष्ट करणे,,सुसूत्रीकरण,याच बरोबर वर्षानुवर्षे नागरिक,कर्मचारी यांची शौचालया अभावी होणारी गैरसोय दूर केली ,पिण्याचे पाणी, येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी स्वागतकक्ष, सेतू सुविधा, बोलक्या भिंती, शासकीय योजनांची माहिती, प्रवेश कमानी, स्वच्छ व मोकळा परिसर, कार्यालया अंतर्गत विविध सोईसुविधा, इत्यादी मुळे ब्रिटिश कालीन इमारतीला कुठेही धक्का न लागता सुंदर व सुबक, आकर्षक अशी रंगरंगोटी करण्यात आली आहे. रेतीमाफिया, नडगाव खडवली येथील अतिक्रमणे अशा धडक कारवाई करून वचक निर्माण केला, नैसर्गिक आपत्ती काळात सर्वांच्या सहकार्याने मदत देणे, जीव वाचविणा-यांचा यथोचित सन्मान करून शासन आपल्या पाठीशी असल्याचे दाखवून दिले, पावसामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले होते, जवळपास८५०हेक्टर क्षेत्राचे पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सुमारे९०लक्ष रुपये आतापर्यंत वितरित करण्यात आले आहे. अशा या विविध कामामुळे तहसीलदार सचिन शेजाळ हे तालुक्यात चांगले आधिकारी म्हणून नावलौकिक मिळवत होते, असे असताना केवळ दिड वर्षाचा कालावधी झाला असतानाच त्यांचे 'उप व्यवस्थापकिय संचालक, सारथी, जिल्हा अमरावती येथे प्रोमोशनने बदली झाली आहे.



### तालुक्यातील दोन उत्तम अधिकारी जिल्ह्याबाहेर - उलटसुलट चर्चा

तर दुसरे आपल्या शांत संयमी, स्वभावामुळे सर्वाना आपलेसे करणारे कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांची पालघर पंचायत समिती येथे पदोन्नतीने बदली झाली आहे, ते २८सप्टेंबर२०२४मध्ये कल्याण पंचायत समिती हजर झाले होते, केवळ१३महिन्यात त्यांची बदली झाली आहे, त्यांनी ही प्रशासनत अनेक उल्लेखनीय कामगिरी केली आहे, तत्कालीन सीईओ रोहन घुगे यांनी कल्याण पंचायत समिती ला भेट देऊन त्यांच्या कामाचे कौतुक केलं होतं. विविध अभियान, उपक्रम, योजना, घरकुल, आदी मध्ये पंचायत समितीचे चांगले काम सुरू आहे. अशा या कर्तव्यनिष्ठ,कार्यतत्पर, गुणी आणि चांगल्या अधिका-यांच्या बदल्या जिल्ह्याबाहेर झाल्याने तालुक्याचे काय?असा प्रश्न उपस्थित होत आहे,

## कर्जत, कसाऱ्यातील प्रवाशांना लवकरच १५ डब्यांची लोकल

### डिसेंबर पर्यंत २७ स्थानकांच्या विस्तारीकरणाचे काम पूर्ण होणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी

**मुंबई :** कर्जत, कसारा मार्गावरील प्रवाशांना लवकरच दिलासा मिळण्याची शक्यता आहे. कर्जत, कसारा स्थानकांदरम्यान १५ डब्यांची लोकल चालविण्यासाठी २७ रेल्वे स्थानकांच्या विस्तारीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून ही कामे डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य मध्य रेल्वे प्रशासनाने ठेवले आहे.

सध्या सीएसएमटी ते कल्याणदरम्यान १५ डबा लोकलच्या सुमारे २२ फेऱ्या चालतात. तर कल्याण-कसारा, कल्याण-खोपोली दरम्यानच्या स्थानकांच्या फलाटाची लांबी कमी असल्याने १५ डब्बा लोकल चालविण्यात अडथळा येत आहे. मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महानगरातील ३४ स्थानकांच्या विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. यापैकी २७ स्थानकांचे विस्तारीकरण डिसेंबरअखेरीस पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

माहितीनुसार, २७ पैकी सर्वाधिक स्थानके कल्याण- कर्जत- खोपोली आणि कल्याण- कसारा या मार्गावरील आहेत. सुरुवातीला, सध्या कार्यरत असलेल्या १२ डब्यांच्या काही लोकलचे रूपांतर १५ डब्यांमध्ये केले जाईल आणि नंतर टप्प्याटप्प्याने संख्या वाढवली जाईल.




जगातील महान फुटबॉलपट्टू ,सर्वात श्रीमंत खेळाडू व अब्जाधीश ख्रिस्तियानो रोनाल्डो सांगतो."एक दिवस माझा मुलगा 'ख्रिस्तियानो ज्युनिअर' ने माझ्याकडे ॲप्पलचा आय फोन मागितला पण मी त्याला नाही मिळनार असे सांगितले.

मला माझ्या मुलाला लक्षात आणून द्यायचं आहे की त्याला पाहिजे ते मिळवणे सोपे नाही. शिक्षण ही सर्वात चांगली गोष्ट आहे जी मी त्याला देऊ शकतो." जागतीक कराटे चॅंम्पियन व स्टार ब्रुस ली सांगतो. की "आपल्या मुलांना आपल्याला न भेटलेल्या सर्व सुखसोयी व वस्तू देण्यापेक्षा त्याला त्या सर्व गोष्टी शिकवा ज्या तुमच्या लहानपणात तुम्हाला कोणी शिकवल्या नाहित. भौतिक सुखसोयी कालांतराने नाश पावतील पण तुम्ही दीलेलं ज्ञान, शिकवण त्यांच्यासोबत सदैव राहील व त्यांना आयुष्य जगायचं शिकवतील."

अमाप पैसा असूनही या दिग्गजांचे पैसा ,सुखसोयी व आपल्या मुलांना कस घडवलं पाहीजे याबद्दल विचार किती उत्तम आहेत.

मुलांच्या यशापयशात आई-वडीलांचा वाटा ,त्यांची भूमिका खुप महत्त्वाची असते.

आपण आपल्या मुलांना काय शिकवतो,काय संस्कार देतो हे खुप महत्त्वाच असतं.

मुलांना परीस्थीती व आयुष्यातील वास्तवाची जाणीव करून देणं खुप गरजेच आहे .

आणि आपण काय देतोय आपल्या मुलांना तर महागडा फोन, गाडी,चांगले कपडे,मौज-मजा.

आणि मग म्हातारपणात विचार करतो की मुल का बिघडली , मुलं का आपल्याशी असं वागतात...?

पालक म्हणून आपण त्यांना कधीच जवळ बसवून चांगल-वाईट ,योग्य-अयोग्य याबद्दल सांगितल नाही कस वागायच कस बोलायचं हे आपल्या कृतीतून दाखवलं नाही , त्यांची आवड-निवड,त्यांच फ्रेंड सर्कल याबद्दल विचारल नाही , पालकांहुन जास्त एक मित्र-मैत्रिण बनून त्यांच्याशी वागलो नाही तर मुलं होतीलच तुमच्यापासून दूर आज ना ऊद्या.

आपण पालक म्हणून काय करतो आहे , आपल्या मुलांना आपल्यामागे वारसामधे काय चांगल्या गोष्टी-चांगले विचार-चांगल्या सवयी देत आहोत याचा विचार आपण नक्कीच केला पाहीजे.

आपल्याला सगळ्यांना वाटत आपला मुलगा शिवाजी -संभाजी महाराजांसारखा शुर-पराक्रमी, जाणता व्हावा पण त्यासाठी गर्भसंस्कारांच महत्त्व न विसरता गर्भवती असताना वायफळ सिरीयल बाजुला ठेवून जिजाऊंप्रमाणे रामायण-महाभारत, शौर्यकथा,चांगली पुस्तके वाचायला-पहायला मात्र आम्ही तयार नाही. सगळ्यांना वाटत आमचा मूलगा सचिन तेंडुलकरसारखा व्हावा पण त्यासाठी रमेश तेंडूलकरांसारखी वयाच्या ५-६ वर्षापासून त्याच्या हातात बॅट द्यायला मात्र कोणी तयार नाही.

किशोर बाळकृष्ण पाटील
(9225407143)
मु-म्हसवळ, पो-कोंढले
ता-वाडा ,जि- पालघर

सगळ्यांना वाटत आपली मूलगी -झाशीची राणी ,लता मंगेशकर ,मेरी कोम, पी.व्ही.सिंधू व्हावी पण त्यासाठी मुलींना मुलांपेक्षा कमी न लेखता आपल्या आवडी-निवडी , पाहीजे ते करीयर करण्याचं स्वातंत्र्य मात्र द्यायला आम्ही तयार नाही. आपल्याला पालक म्हणून काही गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील व कराव्या लागतील.

बिकॉज इवरी चाईल्ड इज स्पेशल .

लहानपणापासून त्यांच्या हातात मोबाईल-टी.व्ही चा रीमोट न देता एखादी कला, एखादा छंद, एखाद वाद्य ,एखाद शस्त्र , एखाद चांगल पुस्तक द्याव लागेलं.तरच या देशासाठि एक जबाबदार, संवेदनशील व सुसंस्कृत पिढी घडवण्यामधे आपण यशस्वी ठरू.

बाल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

---

# एमपीएससी मुख्य परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी मुलाखतीचा लाभ घ्यावा

## - आयुक्त सौरभ राव



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेच्या वतीने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या सन 2025 मधील मुख्य परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी नोव्हेंबर 2025 आणि डिसेंबर 2025 मध्ये दोन दिवसीय "प्रतिरूप मुलाखतीचे (MOCK-INTERVIEW)" सत्राचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी या "प्रतिरूप मुलाखतीचा (MOCK-INTERVIEW)" लाभ घेण्याचे आवाहन प्रशासक तथा महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगा मार्फत. 25 मे 2025 रोजी UPSC पूर्व परीक्षा-2025 आयोजित करण्यात आली होती. तद्नंतर केंद्रीय लोकसेवा आयोगा मार्फत 22 ऑगस्ट 2025 ते 31 ऑगस्ट 2025 रोजी पर्यंत UPSC मुख्य परीक्षा-2025 आयोजित करण्यात आलेली असून, सदर मुख्य परीक्षेत उत्तीर्ण होऊन अंतिम मुलाखतीस पात्र झालेल्या विद्यार्थ्यांकरिता चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेमार्फत "प्रतिरुप मुलाखतीचे (MOCK-INTERVIEW)" सत्राचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर मुलाखत पॅनलमध्ये कार्यरत व सेवानिवृत्त IAS/IPS/IRS, UPSC तज्ज्ञ मार्गदर्शक आणि वरिष्ठ पत्रकार इत्यादी मान्यवरांचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रतिरुप मुलाखतीत (MOCK INTERVIEW) सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी संस्थेच्या cdinstitute@thanecity.gov.in या ई-मेलवर आपले DAF-2 ॲप्लीकेशन सादर करावे. संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या DAF-2 ॲप्लीकेशनचे संस्थेच्या तज्ज्ञ प्रशिक्षकाकडून विश्लेषण (DAF Analysis) करण्यात येईल, जेणेकरून विद्यार्थ्यांना प्रतिरुप मुलाखतीत आणि UPSC च्या अंतिम मुलाखतीत मोठ्या प्रमाणात फायदा होईल. त्यामुळे प्रतिरुप मुलाखतीस इच्छूक विद्यार्थ्यांनी 28 नोव्हेंबर 2025 रोजी पर्यंत https://forms.gle/o2KDHWsNZNeqdn6X9 या लिंक वरती नाव नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी संस्थेच्या 25881421 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था ही केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना आणि इतर संलग्न परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना नि:शुल्क मार्गदर्शन करणारी अग्रगण्य संस्था आहे. तसेच, अशा पध्दतीने प्रशासकीय प्रशिक्षण संस्था चालविणारी देशात ठाणे महानगरपालिका ही एकमेव महानगरपालिका आहे. आजतागायत संस्थेतील एकूण 91 प्रशिक्षणार्थींनी UPSC आणि 400 पेक्षा अधिक प्रशिक्षणार्थींनी MPSC व तत्सम स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेले आहे.

# ठाणे केसरी शरीर सौष्ठव स्पर्धेत अभिषेक तृतीय

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण**: 'ठाणे केसरी' आणि 'ठाणे कुमार' २०२५ - २६ शरीरसौष्ठव स्पर्धेत कल्याण, आडीवली - ढोकळी, समर्थ नगर परिसरात राहणारे अभिषेक दळवी यांनी 'ठाणे केसरी' त तृतीय क्रमांक तर 'ठाणे कुमार'मध्ये चतुर्थ क्रमांक पटकाविला. वेळप्रसंगी कुटुंबियांच्या मदतीसाठी अभिषेकने फूटपाथवर चहा विकून घराला हातभार लावला आहे. घरची हलाखीची परिस्थिती असून देखील स्वतःच्या मेहनतीवर अभिषेकने हे यश खेचून आणले आहे. त्याच्या या कामगिरीबद्दल सर्व स्तरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# रायगड जिल्ह्यात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये 13 डिसेंबर 2025 रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग श्रीमती तेजस्विनी निराळे यांनी दिली आहे.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रलंबित प्रकरणे तसेच ग्रामपंचायत यांच्याकडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, विजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांचेकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे सदर लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात.

13 डिसेंबर 2025 रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग राजेंद्र सावंत यांनी केले आहे.

# मुरबाड शहरातील अवैध धंदे तात्काळ बंद करा

## स्नेहल देसले यांचे पोलिसांना निवेदन






दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड शहरात गेली अनेक दिवस पोलीसांच्या डोळया देखत अवैध जुगार, मटका, गुटखा,पाकोळी, गावठी दारू विक्री, भंगार व्यवसाय चालू असल्याचे निदर्शनास येत आहे. हे अवैध धंदे कोणाच्या आशिर्वादामुळे राजरोसपणे सुरु आहेत. याची चौकशी गुलदस्त्यात आहे.हे सर्व धंदे बंद झाले पाहिजेत यासाठी आपण त्वरित या विषयात लक्ष घालून मुरबाड शहरातील अवैध धंदे त्वरित बंद करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी असे लेखी निवेदन स्नेहल देसले यांनी मुरबाड पोलीसांना दिले आहे.. तसेच आपल्या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही न झाल्यास मी माझ्या वंचित बहुजन आघाडी पक्षाच्या वतीने आपल्या पोलीस स्टेशन बाहेर आंदोलन करेल असा इशारा मुरबाड शहर वंचित बहुजन आघाडीचे मुरबाड शहर अध्यक्ष स्नेहल देसले यांनी दिला आहे.

# सायबर गुन्हेगारीचं ठाव घेणारं 'इनोसंट'



डावीकडून : ईशा-अबोली जाधव, अवनी -कविता ठोंबरे, प्रतीक-मितेश गुरव, अभिजीत-ज्ञानेश्वर सकपाळ, हिमांशू -स्वप्नील भोईर, इन्स्पेक्टर - शत्रुघ्न दराडे

> वाढते सायबर गुन्हे पाहता संपूर्ण देशात आणि महाराष्ट्रात 'इनोसंट' या नाटकाचे प्रयोग आम्ही करणार आहोत. अर्थात ह्यासाठी पोलिसांचे व सरकारचे सहकार्य आम्हाला लाभेल अशी आशा आम्ही बाळगतो ; कारण हा नाट्यप्रयोग सायबर क्राईमवर अभ्यास करून जनजागृती म्हणून आम्ही सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहोचवणार आहोत.
>
> - अशोक हंडोरे (लेखक, दिग्दर्शक)

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : 64 व्या महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धेत डी डी वाय सकपाळ फाउंडेशन प्रस्तुत सत्य घटनांवर आधारित 'इनोसंट' या दोन अंकी प्रायोगिक नाटकाचे आचार्य अत्रे रंगमंदिर कल्याण येथे बुधवार १२ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं.७ वाजता सादरीकरण झाले.

सध्या देशात सर्वत्र सायबर क्राईम खूप वाढले आहेत.वेगवेगळया पद्धतीचा अवलंब करून सायबर क्राईमर इनोसंट लोकांना ब्लॅकमेल करून आपल्या जाळयामध्ये अडकवतात आणि त्यांच्याकडून खूप सारे पैसे उकळतात त्यांचा उद्देश पैसे कमवणे हा असतो, आणि त्यासाठी ते वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करतात.ह्यात सुंदर युवती विवस्त्र होऊन व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून समोरील माणसांचे फोटो काढून ब्लॅकमेल करून पैसे कमवले जातात. हे खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्याला हनी ट्रॅप म्हणतात. केवळ एवढेच नाही तर याशिवाय अनोळखी माणसाकडून लिंक पाठवल्या जातात आणि त्या लिंक आपण ओपन केल्या की ,आपले बँक डिटेल्स सायबर गुन्हेगारांकडे जातात.अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात सायबर गुन्हे वाढलेले आहेत.जितक्या नवनवीन टेक्नॉलॉजी उपलब्ध झालेल्या आहेत तितकाच सर्व सामान्य माणसाला त्याचा उपयोग सावधगिरीने करण्याची आवश्यकता झालेली आहे. कारण त्या टेक्नॉलॉजी ब्लॅक मेलरसाठी लाभदायी ठरल्या आहेत. सर्वसामान्य माणसांच्या चार पावलं ते सतत पुढे असतात. असे अजून अनेक फसवणुकीचे प्रकार आहेत. परंतु ते सर्वच नाटकात दाखवू शकत नाही. त्यामुळे उत्तम मार्ग सतर्क राहणे खूप महत्त्वाच आहे. हेच हयातून शिकायला मिळते. कारण ब्लॅकमेलरमुळे मोठ-मोठी मंडळी जस की इंजिनियर, डॉक्टर ,मोठमोठे उद्योजक तसेच अनेक परदेशी लोक सुद्धा फसले गेले आहेत. तसेच त्यांनी आत्महत्या सुद्धा केलेल्या आहेत. त्यामुळे ब्लॅकमेलरच्या फसवणूकीच्या पद्धति समजून घेऊन त्यांच्या प्रलोभनांना बळी न पडता सर्वांनी सतत सतर्क राहिले पाहिजे. ह्या गोष्टींपासून चार पावलं दूर राहिल पाहिजे आणि यासाठी आपली जी पोलीस यंत्रणा आहे त्याची मदत घेतली पाहिजे. अशी जनजागृती करण्यासाठी हे नाटकाचं प्रयोजन केलेल आहे. असे दिसून येते. तसेच समाजातील वाढत्या गुन्हेगारीच्या समस्येला आळ बसावा ह्यासाठी केलेल्या ह्या नाट्य प्रयोगाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. तसेच नाट्य स्पर्धेत ह्या नाट्य प्रयोगाला यश मिळावे ह्यासाठी प्रेक्षकांनी शुभेच्छा व्यक्त केल्या .





**नाटकाची थीम : "सायबर क्राईम - रंगमंचावर खेळला जाणार.. अदृश्य गुन्हेगारांचा खेळ"**

### 'इनोसंट'

**लेखक, दिग्दर्शक, नेपथ्य, संगीत : अशोक हंडोरे**
**निर्माता : डॉ. ज्ञानेश्वर यशवंत सकपाळ**
**प्रकाश योजना : ऋषिकेश वायदंडे**
**संगीत संयोजन : राहुल कदम**
**रंगमंच व्यवस्था : सुभाष, अबोली**
**रंगभूषा : अभय शिंदे**
**वेशभूषा : अबोली**

**प्रवेशानारूप पात्र परिचय :**
**अवनी : कविता ठोंबरे**
**प्रतिक : मितेश गुरख**
**इशा : अबोली जाधव**
**इन्स्पेक्टर : शत्रुघ्न दराडे**
**कॅमेरामन / हिमांशू : स्वप्नील भोईर**
**अभिजीत : डॉ. ज्ञानेश्वर सकपाळ**
**भेळवाला / आवाज : सुभाष चव्हाण**
**भेळवाल्याची मुलगी : कु. हर्षदा कांबळे**

६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२५-२६

# जनावरांची अवैध वाहतूक

## पाच जणांना अटक ■ एक फरार



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण तालुक्यातील वरसई फाट्याजवळ जनावरांना गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध करून अवैद्यरीत्या वाहतूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात पेण पोलिसांना यश आले आहे. या याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली असून एक आरोपी फरार झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपीने दोन चारचाकी वाहना मधून चार जनावरांना बेशुद्ध अवस्थेत कोंडून वाहतूक केली होती सोमवारी रात्री सापळा रचून ही कारवाई केली.या प्रकरणी शरीफ रफिक अन्सारी(२५) इम्रान मलंग पटेल (३६) मुंब्रा ठाणे, सलमान अब्दुल अहमद पटेल (३६), सोनू जुबेर खान (२२,) बाजल रशीद शेख (१९) पनवेल, या आरोपींना अटक करण्यात पोलिसांनी यश आले आहे तर अजित शेख राहणार तळोजा हा आरोपी फरार असून त्याचाही पोलिसांकडून शोध सुरू आहे कारवाई संदर्भात स्वप्रिल गजानन म्हात्रे यांनी पेण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.

# सरळ सेवेतील लिपिक टंकलेखक पदाकरिता अर्ज भरण्यास मुदतवाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : सैनिक कल्याण विभागातील सरळ सेवेतील लिपिक टंकलेखक (गट-क) पदभरतीबाबत सैनिक कल्याण विभागाच्या www.mahasainik.maharashtra.gov.in, या संकेत स्थळावर उमेदवाराकडुन ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि.05 नोव्हेबर 2025 पर्यंत देण्यात आली होती. तथापि जास्तीत जास्त उमेदवारांना अर्ज भरण्याची संधी मिळण्याकरिता अर्ज भरण्याकरिता दि.26 नोहेबर 2025 रोजी संध्याकाळी 23.59 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून जास्तीत जास्त उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड अलिबाग ले. कर्नल राहुल वैजनाथ माने (नि.) यांनी केले आहे.




# भविष्यवेध



शुक्रवार
१४ नोव्हेंबर २०२५

**मेष**
सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. आज तुम्ही भविष्यातील योजनांवरही विचार करू शकता. यामुळे तुमचे ध्येय साध्य होण्यास मदत होईल.

**वृषभ**
संयम आणि संयम राखाल, ज्यामुळे सर्व समस्यांवर उपाय शोधणे सोपे होईल. जुन्या मौल्यवान वस्तूंसाठी सौदेबाजी केल्याने तुम्हाला फायदा होईल.

**मिथुन**
अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. तुमची आर्थिक परिस्थिती देखील सुधारेल. आत्मविश्वास यशाची गुरुकिल्ली ठरेल.

**कर्क**
नवीन कामे हाती घेण्याचा मोह होऊ शकतो. व्यवसायात वाढ होण्याची शक्यता आहे. काम अत्यंत काळजीपूर्वक करा

**सिंह**
तुमच्या प्रेम जोडीदारासाठी आजचा दिवस चांगला असेल.विचार सकारात्मक ठेवा आणि नकारात्मक विचारांना तुमच्यावर वर्चस्व गाजवू देऊ नका.

**कन्या**
नोकरी बदलण्याचा विचार करू शकता, परंतु पुढे जाण्यापूर्वी तुम्ही फक्त एक चांगला पर्याय विचारात घ्यावा. प्रलंबित काम पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल.

**तुळ**
व्यवसायात कुटुंबाकडून काही प्रमाणात पाठिंबा मिळू शकेल. कामाच्या ठिकाणी तुमच्या बोलण्यावर संयम ठेवणे फायदेशीर ठरेल. आरोग्य चांगले होईल.

**वृश्चिक**
खर्चावर नियंत्रण ठेवा.काही आशादायक गुंतवणुकीच्या संधी मिळू शकतात. नवीन कल्पना येत राहतील. निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला आहे.

**धनु**
तुम्ही तुमच्या जबाबदाऱ्यांवर पूर्णपणे लक्ष केंद्रित कराल आणि प्रत्येक काम उत्साहाने पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल. तुमच्या योजना बदलू शकतात.

**मकर**
मित्रांसोबत हस्तकला प्रदर्शनाला उपस्थित राहू शकता. तुम्ही सकारात्मक ऊर्जा टिकवून ठेवाल. कोणत्याही गोष्टीवर लगेच प्रतिक्रिया देणे टाळा.

**कुंभ**
ज्येष्ठांचा सल्ला फायदेशीर ठरेल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. कल सामाजिक कल्याणाकडेही असेल. शत्रू विरुद्ध जास्त काळ टिकू शकणार नाहीत.

**मिन**
धार्मिक तीर्थयात्रेला जाऊ शकता. राजकीय कार्यातही तुमची आवड वाढेल. तुमचे काम यशस्वी होईल. आज शेजाऱ्यांमध्ये तुमचा आदर वाढेल.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# ठाकरे सेनेच्या शहरप्रमुखांसह मनसे पदाधिकारी भाजपच्या वाटेवर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** - उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर आता डोंबिवलीतील ठाकरे गटाचे बहुतांशी पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपमध्ये घेण्यासाठी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दीपेश म्हात्रे यांनी सुरूवात केली आहे. ठाकरे गटाचे म्होरके भाजपमध्ये दाखल झाल्याने ठाकरे गटाला डोंबिवलीत खिंडार पडले आहे. ठाकरे गटाबरोबर मनसेचे पदाधिकारी भाजपमध्ये दाखल झाले आहेत.

मनसेचे डोंबिवलीतील काही माजी ज्येष्ठ नगरसेवक शिंदे गटाच्या मार्गावर होते. पण त्यांची गणिते बिघडल्याने त्यांचा शिंदे शिवसेनेत प्रवेश झाला नसल्याची ठाणे, मुंबईत राजकीय वर्तुळात चर्चा आहे. त्यामुळे या नगरसेवकांनी भाजपची वाट धरण्याचा निर्णय घेतला असल्याची चर्चा आहे. आपल्या स्थानिक नेत्याच्या इशाऱ्यावरून ही मंडळी भाजपमध्ये प्रवेश करत असल्याची चर्चा शहरात आहे.

**भाजपमध्ये जोरदार इनकमिंग**

मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात गुरूवारी झालेल्या कार्यक्रमात डोंबिवलीतील ठाकरे गटाचे शहरप्रमुख ओमनाथ नाटेकर, शाखा प्रमुख सचिन कुर्लेकर, शहर संघटक हरिश्चंद्र पराडकर, मनसेचे विद्यार्थी सेना अध्यक्ष मिलिंद म्हात्रे, विभागप्रमुख गणेश यादव, शाखा अध्यक्ष समीर पाटील यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला.

येत्या दोन दिवसात मनसेचे डोंबिवलीतील काही ज्येष्ठ नगरसेवक, काही सामाजिक कार्यकर्ते आपल्या कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या जोरदार हालचाली सुरू असल्याची विश्वसनीय माहिती आहे. या पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हाध्यक्ष नंदू परब, प्रदेश नेते शशिकांत कांबळे, माजी नगरसेवक संतोष केणे, माजी नगरसेवक मंदार हळबे, पप्पू म्हात्रे उपस्थित होते.

# ठाण्यातील खाजगी शाळांच्या दुरवस्थेविरोधात काँग्रेसचे आंदोलन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व खाजगी शाळांच्या इमारतींचे संरचनात्मक परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्याचा निर्णय पालिकेच्या शिक्षण विभागाने घेतला होता. मात्र, या आदेशाची अद्याप अंमलबजावणी झालेली नसून शिक्षण विभागाच्या या दुर्लक्षितपणा विरोधात काँग्रेसने पालिका मुख्यालयासमोर बुधवारी पुन्हा आंदोलन केले. यावेळी कागदी घोडे नाचवणाऱ्या शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना काळे फासण्याचा इशारा देण्यात आला.

ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये एकूण ७६९ खाजगी शाळा आहेत. त्यात २०९ खाजगी अनुदानित आणि ५६० विनाअनुदानित शाळा आहेत. याशिवाय, ठाणे महापालिकेच्या ९५ प्राथमिक तर ७माध्यमिक अशा एकुण १०२ आहेत. २०१४ साली शिक्षण मंडळ बरखास्त करून सरकारने शिक्षण समितीमार्फत कारभार सुरू केला. मात्र, तेव्हापासुनच शैक्षणिक अधोगती सुरु झाल्याचा आरोप ठाणे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन केला होता. ठाणे महापालिका शाळांच्या एकूण ७६ इमारतींपैकी सद्यस्थितीत ६९ इमारती शाळा भरत असून उर्वरीत ७ शाळांची दुरवस्था बनल्याने विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून शाळेत बसावे लागते. ठाणे महापालिकेला ३५९ कोटी ३४ लाख इतके अनुदान प्राप्त होते, तरीही विद्यार्थी व शिक्षकांना त्याचा फायदा होत नसल्याचा आरोप चव्हाण यांनी केला होता.

प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बर्गे, अर्थतज्ञ विश्वास उटगी, प्रदेश सचिव मधु मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. शालेय शिक्षण व्यवस्थेतील ढासळलेली गुणवत्ता, विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा न मिळणे, शिक्षकांची रिक्त पदे यासह इतर प्रलंबित मागण्या तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना काळे फासण्याचा इशारा विक्रांत चव्हाण यांनी दिला.



# 90 फुटी रस्त्याने घेतला मोकळा श्वास

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** - ठाकुर्ली ९० फुटी रस्त्यावर रस्त्यालगतच्या संरक्षक भिंतीवर कल्याण डोंबिवली पालिकेने तीन ते चार वर्षापूर्वी महापुरूष, राष्ट्रीय खेळाडू, सन्मानिय व्यक्ति यांच्या प्रतिमा काढून घेतल्या आहेत. शहराच्या प्रवेशद्वारावर एक प्रसन्न वातावरण असावे हा यामागील मुख्य उद्देश होता. परंतु, एका स्थानिक जमीन मालकाने संरक्षक भिंती लगत पालिकेच्या फ प्रभाग, नगररचना विभागाची परवानगी न घेता काही दिवसापूर्वी बेकायदा गाळयांची उभारणी केली होती. ही माहिती मिळताच फ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी संबंधित गाळे आणि लगतची पदपथ आणि संरक्षण भिंतीलगतची अतिक्रमणे बुधवारी भुईसपाट केली.

अचानक झालेल्या या कारवाईने ठाकुर्ली ९० फुटी रस्ता भागात पदपथ अडवून बसलेल्या विक्रेत्यांची दाणादाण उडाली. ठाकुर्ली ९० फुटी रस्ता भागात सुशोभित करण्यात आलेल्या भिंतीलगत लोखंडी प्रवेशद्वार बसवून बेकायदा गाळे उभारण्याची कामे सुरू आहेत. या गाळ्यांचे पक्के बांधकाम केले जात आहे, अशा तक्रारी डोंबिवलीतील फ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांच्याकडे आल्या होत्या.

**९० फुटी रस्त्यावरील सुशोभित करण्यात आलेल्या संरक्षक भिंतीला यामुळे धोका निर्माण करण्यात आला होता.**

**पालिकेच्या साहाय्यक आयुक्त मुंबरकर यांनी घटनास्थळाची पाहणी केली. त्यावेळी त्यांना या बेकायदा गाळयांमुळे महापुरूष, राष्ट्रपुरूष, साहित्यिक, सन्मानिय व्यक्ति यांच्या ९० फुटी रस्त्यालगतच्या संरक्षक भिंतीवर काढण्यात आलेल्या प्रतिमा खराब होण्याची शक्यता वाटली. या गाळेधारकाने पालिकेची परवानगी घेतली आहे का, याची माहिती साहाय्यक आयुक्तांनी घेतली. या गाळयाला पालिकेची बांधकाम परवानी नसल्याने आणि या बेकायदा गाळयामुळे महापुरूषांच्या प्रतिमा रंगविलेल्या भिंती खराब होण्याची शक्यता होती. त्यामुळे साहाय्यक आयुक्त मुंबरकर यांनी तातडीने प्रभागातील तोडकाम पथक पाचारण केले. आणि सुरू असलेले बेकायदा गाळयांचे बांधकाम जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट केले. या गाळयाला जोडून नंतर इतर भूमाफियांनी बेकायदा बांधकामे उभारली असती. त्यामुळे हा बेकायदा गाळा तात्काळ तोडून टाकण्यात आला, अशी माहिती साहाय्यक आयुक्त मुंबरकर यांनी दिली.**

# मंगला एक्सप्रेसमध्ये थरार - सीटच्या वादातून 'कात्री' ने वार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : एक्स्प्रेस रेल्वेगाडीत प्रवाशाला आसनावर झोपू नको अशी विनंती केल्यानंतर संतापलेल्या त्या प्रवाशाने आणि त्याच्या सहकाऱ्याने एकावर 'कात्री'ने पोटावर वार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. जखमी प्रवासी भोला पाल (२४) हे मजूर असून ते उत्तरप्रदेशातील कानपूर भागात वास्तव्यास आहेत.




त्यांचा पुतण्या मनीष गौतम (१९), मित्र प्रकाश पासवान (२३), सोनू पासवान (२०), अरुण पासवान (२२) यांच्यासोबत ते कोकणात कामानिमित्ताने गेले होते. कामे आटोपल्यानंतर त्यांनी बुधवारी कणकवली रेल्वे स्थानकातून गावी परतण्यासाठी मंगला एक्स्प्रेस या रेल्वेगाडीच्या सामान्य (जनरल) डब्यातून प्रवास सुरु केला.

एक्स्प्रेस रेल्वेगाडी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास पनवेल स्थानकात आली. रेल्वेगाडी काही अंतरावर आल्यानंतर एक आसन रिकामे असल्याने ते तेथे गेले. परंतु त्याचवेळी एक प्रवासी त्या आसनावर आला आणि झोपून प्रवास करु लागला. हा सामान्य डबा असून आसनावर बसून प्रवास करा अशी विनंती त्या प्रवाशाला भोला आणि त्यांचा मित्रांनी केली. त्यानंतर त्या प्रवाशाने त्यांना शिवीगाळ सुरु केली. आणि पोटावर कात्रीने हल्ला शिवीगाळ सुरु असतानाच त्या प्रवाशाचा दुसरा एक साथिदार त्याठिकाणी आला. त्याने भोला आणि त्यांच्या सहकाऱ्यांना शिवीगाळ आणि मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्या प्रवाशाने बॅगेतील कात्री काढून भोला यांच्या पोटावर वार केला. भोला यांच्या सहकाऱ्यांनी तात्काळ १३९ या क्रमांकावर संपर्क साधला.

एक्स्प्रेस रेल्वेगाडी सुमारे अर्ध्या तासाने कल्याण रेल्वे स्थानकात थांबविण्यात आली. त्यानंतर भोला आणि त्यांच्या सहकाऱ्यांना तेथील पोलिसांनी खाली उतरविले. तसेच भोला यांना कल्याण येथील सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी मुंबई येथील शीव रुग्णालयात दाखल केले.

भोला याने पोलिसांना दिलेल्या जबाबानंतर याप्रकरणी ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ चे कलम ११८ (3), 3(4) आणि ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेनंतर प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न देखील ऐरणीवर आला आहे. चोरीच्या घटना अनेकदा एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांमध्ये घडतात. परंतु आता प्रवाशावर हल्ला झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

# जमिनीच्या वादातून देवरुंग येथे गोळीबार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा ता. १३ (बातमीदार)** भिवंडी तालुक्यातील देवरूंग येथे जमिनीच्या वादातून चुलत मामानेच सहा जणांशी संगनमत करून भाच्यावर गोळीबार केल्याची घटना घडली आहे. विकी दळवी (२८) रा. देवरूंग असे गोळीबारात जखमी झालेल्या भाच्याचे नाव आहे. त्याचे चुलत मामासोबत जमिनीवरून वाद सुरू होता. मंगळवारी (ता.११) रात्री सातच्या सुमारास तो आपल्या दुचाकीवरून लोनाड येथे रुग्णालयात जात होता. यावेळी चुलत मामाने इतर आरोपींसह पाठलाग करून देवरुग गावाजवळ भररस्त्यात विकीवर गोळीबार केला. गोळीबारात गंभीर जखमी झालेल्या विकीला कल्याण येथील आयुष या खाजगी इस्पितळात दाखल केले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. याप्रकरणी पडघा पोलिस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आतापर्यंत चुलत मामासह रुपेश म्हात्रे, राकेश म्हात्रे, किसन म्हात्रे, भरत पाटील, विश्वनाथ पाटील, चेतन शिसवे सर्व देवरुग या एकूण सहा जणांना अटक केली असून त्यांना बुधवारी न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# बदलापूरचा पारा घसरला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर, ता. १३ : दिवाळीनंतर वातावरणात मोठा बदल जाणवत असून, आता बदलापूर शहरात थंडीची चाहूल लागली आहे. गेल्या दोन दिवसांपासून शहराचे तापमान लक्षणीयरीत्या घटले असून, सकाळ-संध्याकाळच्या वेळी ते १५ ते १६ अंश सेल्सिअस इतके कमी झाले आहे.**

गेल्या दोन दिवसांपासून पहाटेच्या वेळी शहरात चांगलाच गारठा वाढला आहे. शाळा-कॉलेजला जाणारे विद्यार्थी आणि सकाळी फिरायला निघालेले नागरिक, अशा सर्वांनाच या थंडीची जाणीव होत आहे. अनेक घरांतून आता चादरी, घोंगड्या आणि स्वेटर पुन्हा बाहेर काढले जात आहेत. सकाळी हवेत थोडासा धुरकटपणा आणि दवबिंदू जाणवत असल्याचे नागरिकांनी सांगितले. हवामान खात्याचे अभ्यासक अभिजित मोडक यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील आठवडाभर हे थंड वातावरण कायम राहण्याची शक्यता आहे. थंड वाऱ्यांचा प्रभाव वाढल्याने तापमानात घट झाली आहे. आठवड्यानंतर दक्षिण भारताच्या किनारपट्टीवर कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे तापमानात पुन्हा काही प्रमाणात वाढ होऊन आर्द्रतेत बदल जाणवू शकतो. थंडीची सुरुवात असल्याने नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांनी केले आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दमा/सर्दी-खोकल्याची तक्रार असलेल्या व्यक्तींनी सकाळ-संध्याकाळ घराबाहेर पडताना उबदार कपड्यांचा वापर करावा, असा सल्ला देण्यात आला आहे.

# वाडा नगरपंचायत निवडणुकीत कुणबी मतांचे प्राबल्य

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाडा, ता. १३ (बातमीदार):** सध्या महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकाचे पडघम वाजत आहे. पालघर जिल्ह्यातील वाडा नगर पंचायतीच्या नगराध्यक्षासह १७ प्रभागांसाठी निवडणूक जाहीर झाली असून, सध्या राजकीय पक्षांकडून योग्य उमेदवारांचा शोध सुरू आहे. नामनिर्देशन पत्र भरण्याची लगबग सुरू आहे. वाडा नगर पंचायतीच्या नगराध्यक्ष पदासाठी सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण घोषित झाले आहे. वाडा नगरपंचायत हद्दीत कुणबी समाजाचे प्राबल्य असल्याने सर्वच पक्षांकडून कुणबी समाजाच्या सक्षम उमेदवाराचा शोध सुरू असून, बरेच उमेदवार इच्छुक म्हणून पुढे येत आहेत.

वाडा नगर पंचायत हद्दीत कुणबी समाजाच्या खालोखाल आदिवासी, वैश्य वाणी, आगरी, दलित, भानुशाली, मराठा व इतर समाज घटकांचे मतदार आहेत. परंतु सर्व समाजांच्या तुलनेत कुणबी समाजाचे मताधिक्य अधिक आहे. मागील लोकसभा, विधानसभा निवडणुकांमध्ये कुणबी समाजाच्या मतांचा प्रभाव वारंवार दिसून आल्याने नगराध्यक्ष पदासाठी सर्व पक्षांनी कुणबी समाजाला प्राधान्य द्यावे, अशी मागणी कुणबी समाजातून जोर धरत आहे. त्यासाठी शहरात गेल्या काही दिवसांपासून विविध राजकीय पक्षांतील आणि सामाजिक संघटनांचे कुणबी कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी आपल्या समाजातील होतकरू, शिक्षित आणि प्रभावी महिला उमेदवाराला नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी मिळावी, अशी मागणी सुरू केली आहे.

पालघर जिल्ह्यात पेसा कायद्यामुळे नगर पंचायत वगळता इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जमातींसाठी सर्व प्रमुख पदे आरक्षित असल्याने बहुसंख्य असलेल्या कुणबी समाजासाठी राजकीय संधी संपुष्टात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर वाडा नगराध्यक्षपद सर्वसाधारण महिलांसाठी राखीव झाल्याने कुणबी समाजासाठी ही एक महत्त्वाची राजकीय संधी म्हणून पाहिली जात आहे. यासाठी कुणबी समाजाच्या विविध संस्था व संघटनांच्या बैठका झडत आहेत. त्यातून कुणबी समाजालाच प्राधान्य मिळावे, अशी मागणी जोर धरत आहे.

# मालमत्ता कर थकबाकीमुळे भिवंडी पालिका अधिकारी चिंताग्रस्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी,ता (प्रतिनिधी )**

भिवंडी महापालिका कार्यक्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांना महापालिका प्रशासनाकडून योग प्रकारे नागरी सुविधा मिळत नसल्याने अनेक व्यवसायिक व रहिवासी मालमत्ता कर भरण्यासाठी उदासीन भूमिका बजावत आहेत त्यामुळे मालमत्ता कर थकबाकी मोठ्या प्रमाणात वाढत असुन काही कर्मचारी व अधिकारी सुध्दा कर वसुली बाबतीत कसुरी करीत आहेत त्यामुळे महापालिका आयुक्तासह अधिकारी वर्ग चिंताग्रस्त झालेला दिसत आहे. रहिवासी नागरिकांनी मालमत्ता कर भरावा यासाठी सध्या पालिका प्रशासनाकडून अभय योजना राबविण्यात येत आहे मात्र त्यास प्रतिसाद मिळत नसल्याने कर्मचारी हैराण झाले असुन आता कर दाते नागरिकां विरोधात कारवाई करण्याची भूमिका आयुक्तांनी घेतली असल्याचे सांगण्यात आले.

भिवंडी महापालिकेच्या एकूण विविध करांच्या आकडेवारीनुसार शहरातील नागरिकांकडे सध्या ४१८ कोटी रुपयांच्या व्याजासह एकूण ९९४.३० कोटी रुपये मालमत्ता कराची थकबाकी आहे. चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी महानगरपालिकेची मालमत्ता कराची मागणी १७५.७४ कोटी रुपये निश्चित करण्यात आली आहे. तथापि, गेल्या काही वर्षांपासून थकबाकीची रक्कम सातत्याने वाढत आहे आणि आता हि थकबाकीची रक्कम ९९४.३० कोटी रुपयांवर पोहोचली आहे, भिवंडी महानगरपालिकेचा वार्षिक बजेट १०९७ कोटी आहे. तर या वर्षी मालमत्ता धारकांची थकबाकीची रक्कम महानगरपालिकेच्या वार्षिक बजेटच्या जवळपास गेली आहे त्यामुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून पालिका प्रशासनाने कठोर पावले उचलून हि वसुली केली पाहिजे,अशी मागणी नियमित करा भरणाऱ्या मालमत्ता धारकांकडून होत आहे.

या बाबत महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाचे उपायुक्त बाळकृष्ण क्षीरसागर यांनी सांगितले की, मंदावलेली कर वसुली ही बऱ्याच काळापासून वसुली विभागाची एक मोठी समस्या आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत केवळ २९.९६ कोटी जमा झाले. यामध्ये चालू वर्षाच्या मालमत्ता करातून १६ कोटी आणि जुन्या थकबाकीतून १३ कोटी रुपये समाविष्ट आहेत. मालमत्ता कर वसूल करण्यासाठी, महापालिकेने अभय योजना (मालमत्ता करमुक्ती योजना) लागू केली आहे, त्यानुसार १००% व्याज माफी देण्यात आली आहे. या योजनेचा पूर्ण लाभ घेऊन शहरातील नागरिकांनी त्यांचे थकित मालमत्ता कर भरण्याचे आवाहन केले. हि थकबाकी वेळीच न भरल्यास मोठ्या थकबाकीदारांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा महानगरपालिकेने दिला आहे. मालमत्ता कर विभागाचे प्रमुख सुधीर गुरव यांनी सांगितले की, वसुलीची प्रक्रिया जलद करण्यासाठी शहरातील पाच विभाग समित्यांमध्ये ८० हून अधिक लिपिकांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहरातील मालमत्ता मालकांकडून मालमत्ता कर वसूल करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे. थकबाकीदारांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि आवश्यक कारवाई करण्यासाठी विशेष पथके देखील स्थापन करण्यात आली आहेत. तसेच प्रत्येक विभाग समितीला वसुलीचे लक्ष्य (टार्गेट) दिले आहे. त्याचप्रमाणे निर्धारित वेळेत जास्तीत जास्त कर वसूल करण्याचे निर्देश पथकांना दिले आहेत.

# कोनगाव : महिलेवर शेजाऱ्यांचा हल्ला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी ता १३ : :** भिवंडी तालुक्यातील कोनगाव परिसरात एका महिलेवर तिच्या शेजाऱ्यांनी हल्ला. केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४० वर्षीय पीडित महिला कोनगाव सोसायटीत राहते. मंगळवारी (ता.११) संध्याकाळी चार वाजताच्या सुमारास ती तिच्या घरी असताना त्याच सोसायटीतील रहिवासी आकाश लोहार (वय २०) आणि त्याचा अज्ञात साथीदार तेथे आले. जुन्या वादावरून दोघांनी महिलेशी भांडण केले. यावेळी आरोपींनी लाकडी बटू आणि लोखंडी रॉडने महिलेवर हल्ला केला. ज्यामुळे तिच्या उजवा हात, पोट आणि डोक्याला गंभीर दुखापत झाली. स्थानिकांच्या मदतीने जखमी महिलेला तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे तिच्यावर उपचार सुरू आहेत.

आरोपी आकाश लोहार आणि त्याच्या साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या दोन्ही आरोपी फरार आहेत. त्यांच्या शोधासाठी पोलिसांनी एक विशेष पथक तयार केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिलीप धुमणे करत आहेत.




# शिवसेना कल्याण शहर शाखेच्या माध्यमातून दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** शिवसेना मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी गणित व विज्ञान विषयावरील कल्याण मधील सर्वात मोठे मार्गदर्शन शिबीर गुरुवारी कल्याणच्या आचार्य अत्रे रंगमंदिर याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास बळकट व्हावा विषयाविषयी अडचणी दूर व्हाव्यात, आपले स्वतःचे व विद्यालयाचे नाव उज्वल करावे यासाठी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी शिवसेना कल्याण शहर शाखेच्या माध्यमातून शिवसेना कल्याण पश्चिम शहर प्रमुख रवी पाटील यांच्या वतीने तज्ञांचे मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. या सत्राचा उद्देश विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान विषयांतील मूलभूत संकल्पना अधिक दृढ करण्यासाठी, त्यांच्या आत्मविश्वासात वाढविण्यासाठी आणि येणाऱ्या बोर्ड परीक्षेपूर्वी योग्य शैक्षणिक मार्गदर्शन मिळावे विषयी संबंधी महत्त्वाच्या सूचना व महत्त्वाची माहिती देण्यासाठी आयोजित केले होते. सत्रामध्ये अनुभवी शिक्षक तज्ज्ञ यांनी थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले. या शिबिराला कल्याण मधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दोन हजार पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शन शिबिराला उपस्थिती दर्शवली. आगामी परीक्षांच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळणे आवश्यक असून शिवसेना कायम अशा प्रकारचे उपक्रम राबवत असते. तर येणारी पिढी देशाचे भवितव्य असून, त्यांनी चांगला अभ्यास करून आई वडिलांचे स्वप्न पूर्ण केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी नशेच्या विळख्यात न अडकता अभ्यास केला पाहिजे अशी प्रतिक्रिया शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांनी सांगितले. तर दहावीची परीक्षा ही तुमच्या आयुष्यातील एक महत्त्वाची परीक्षा आहे. ही परीक्षा सोपी जाण्यासाठी हा उपक्रम म्हणजे एक छोटासा प्रयत्न आहे. मात्र दहावीची परीक्षा झाल्यावर पुढे काय करायचे या प्रश्नाचे उत्तर मिळवण्यासाठी आपल्या मनाचा आवाज ऐका आणि योग्य तो निर्णय घ्या अशा शब्दांमध्ये खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी व्हिडीओकॉल द्वारे संवाद साधला.

# कल्याण स्थानकात तोतया आरपीएफ निरीक्षकाला अटक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** रेल्वे संरक्षण दलाच्या (आरपीएफ) गणवेशात निरीक्षक असल्याचे भासवून कल्याण स्थानकात फिरणाऱ्या एका तोतया आरपीएफ निरीक्षकाला अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या संशयिताचे नाव अविनाश राजाराम जाधव (२५) असे आहे, जो महाराष्ट्रातील उस्मानाबाद येथील रहिवासी आहे. कल्याण आरपीएफचे मुख्य प्रभारी रंजीत सिंह यांनी सांगितले की, बुधवारी कल्याण आरपीएफचे सहाय्यक उपनिरीक्षक रमेशसिंह यादव त्यांच्या पथकासह प्लॅटफॉर्म क्रमांक २-३ वर गस्त घालत होते. स्टार लावलेला आरपीएफ गणवेश घातलेला एक माणूस दिसला. त्यांच्या गणवेशाच्या डाव्या बाजूला नेमप्लेट पाहून, कर्तव्यावर असलेले अधिकारी रमेश सिंह यादव यांना संशय आला. त्यांनी बनावट निरीक्षक अविनाश जाधव यांना त्यांच्या पोस्टिंगबद्दल विचारले. त्यांनी उत्तर दिले की ते पुण्यात तैनात आहेत आणि वंदे भारत ट्रेनमध्ये स्काउटिंग स्टाफ म्हणून काम करतात.त्यांनी कल्याण आरपीएफचे सहाय्यक उपनिरीक्षक रमेश सिंह यादव यांच्यासोबत सेल्फी घेण्याची ऑफर दिली. एएसआय यादव यांनी त्यांच्या इतर एस्कॉर्टिंग स्टाफबद्दल आणि ते कुठे आहेत याबद्दल विचारले. त्यांनी त्यांना सांगितले की ते सर्व पुलावर आहेत. तथापि, तेथे कोणताही कर्मचारी दिसला नाही. स्टेशन प्रभारी रणजित सिंह म्हणाले की, संशय आल्याने त्याला कल्याण आरपीएफ स्टेशनमध्ये आणण्यात आले, जिथे चौकशीदरम्यान तो बनावट निरीक्षक असल्याचे सिद्ध झाले. आरपीएफ पथकाने पुढील कारवाईसाठी त्याला कल्याण जीआरपीकडे सोपवले. या प्रकरणाचा तपास जीआरपीचे उपनिरीक्षक प्रमोद जगताप करत आहेत.


## हेटवणे वाडीतील चार वर्षाची चिमुकली बेपत्ता

### चोवीस तास उलटूनही तपास नाही

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** पेण तालुक्यातील हेटवणे वाडी येथील ४ वर्षाची चिमुकली अचानक बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आल्याने पोलीस प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली आहे.

सविस्तर बातमी अशी की, बुधवार दिनांक 12 नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास किशोरी किरण महालकर वय 4 वर्षे 6 महिने ही आपली आई सोबत गावाबाहेर एका नाल्या शेजारी शौचालयाला गेली असता आईने आपल्या मुलीला बाजूला उभी करून ठेवली. या चार वर्षाच्या चिमुकलीने एकदा आवाज दिला आई कुठे आहेस तू ?...आई म्हणाली बाळा आलोच मी...या फक्त 5 मिनिटांच्या वेळात ही चिमुकली बेपत्ता झाली. आपली 4 वर्षाची चिमुकली आपल्या सोबत आलेली कुठे दिसेनाशी झाल्याने आईने आरडा ओरडा करायला सुरुवात केली.



अनेक तास होऊन गेले तरी मुलगी घरी येत नाही म्हणून गावकऱ्यांनी शोधकार्य सुरू केले.गावाला लागून घनदाट जंगल असल्याने गावकऱ्यांनी संपूर्ण परिसर शोधून काढला परंतु मुलीचा कुठेही थांगपत्ता लागला नाही. त्यानंतर नातेवाईक पेण पोलिस ठाण्याशी संपर्क केला असता. पेण पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली एक शोध पथक घटना स्थळी रवाना करण्यात आला. परंतु काही हाती लागले नाही.

आई सोबत सकाळी शौचालयाला गेलेली 4 वर्षाची चिमुकली अचानक बेपत्ता झाली आणि दिवस उलटून गेला तरी तिचा तपास न लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.गावाला लागून घनदाट जंगल असल्याने गावकरी जंगलात शोध घेत असतानाच त्यांना या मुलीची चप्पल आणि ड्रेस सापडला परंतु किशोरीचा कुठेच तपास लागला नाही. आता चप्पल आणि ड्रेस मिळाल्याने या विषयाने एक वेगळा वळण घेतला. सदरची घटना पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांना समजताच पोलिस प्रशासनाने ॲक्शन मोड घेत सीआरपी, क्यूआरटी, श्वान पथक आणि खोपोली येथील बचाव पथकाला आमंत्रित करून परिसरात चारही दिशेला शोध मोहीम सुरू केली आहे. परंतु 24 तास उलटून देखील या चिमुकलीचा कुठेही शोध लागत नसल्याने अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

## बापंगाव येथे पतीकडुन पत्नीची निर्घृण हत्या

### अल्पावधीतच पोलीसांनी पतीला ठोकल्या बेड्या

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा :** भिवंडी तालुक्यातील पडघा- कल्याण रस्त्यावरील बापंगाव येथे चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीची धारधार शस्त्राने गळा चिरून निर्घृण हत्या केल्याने परिसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे.

अनिता मोहन बेरडीया (४६) असे हत्या झालेल्या पत्नीचे नाव असुन ती मुलासोबत पतीला सोडुन आर्या रेसीडेन्सी मल्हार नगर बापंगाव येथे विभक्त राहत होती तर पती मोहन केशव बेरडीया(४८) भिवंडी तालुक्यातील देवरुंग येथे मोठ्या मुलांसोबत राहत होता पती मोहन बेरडीया हा अनिता हीच्या चारित्र्यावरून नेहमी संशय घेऊन मारहाण करीत होता. तसेच चारित्र्याच्या संशयावरून त्या दोघांच्यात नेहमी खटके उडत होते १० नोव्हेंबर रोजी अनिता बेरडीया हीचा विवस्त्र अवस्थेतील मृतदेह तीच्या मुलांना व पोलीसांना बापंगाव येथील राहत्या घरी आढळून आला होता. त्यामुळे अनिता हीचा मुलगा हितेश मोहन बेरडीया याच्या तक्रारी वरुन पडघा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता कुठलाही पुरावा नसताना पोलीसांनी आपले स्त्रोत वापरून पती मोहन बेरडीया याला ताब्यात घेऊन पोलीस खाक्या दाखवुन चौकशी केलीअसता त्याने पत्नी अनिता हीची हत्या केल्याची कबुली दिली. पडघा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करुन पती मोहन बेरडीया याला अटक केली आहे. सदर घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## कल्याणमध्ये शिवसेनेच्या वतीने लाडक्या बहिणींचा सन्मान



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** शिवसेनेचे माजी नगरसेवक व उपशहरप्रमुख मोहन उगले तसेच महिला शहर संघटक नेत्रा उगले यांच्या वतीने प्रभाग क्रमांक सात मधील महिलांन साठी नारी सन्मान कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार प्रभाग क्र. 7 मध्ये विविध ठिकाणी लाडक्या बहिणींचा सन्मान हा कार्यक्रम शिवसेना ठाणकर पाडा विभागीय शाखेच्या वतीने राबविण्यात येत आहे. कल्याण पश्चिमेतील काळा तलाव समाधी मंदिर परिसरात बुधवारी हा स्त्री सन्मान कार्यक्रम पार पडला.

यावेळी शिवसेना महिला शहर संघटक नेत्रा उगले, शिवसेना उपशहर प्रमुख मोहन उगले, विभाग प्रमुख अनंता पगार, उपविभाग प्रमुख दिगंबर ठाणगे, शाखाप्रमुख नितीन कदम, उपशाखाप्रमुख गणेश कुंभारकर, विजय डोनटिया, विभाग संघटक सुरेखा दिघे, शाखा संघटक ज्योती पाटील, हिराबाई ठाणगे, आरवी ठाणगे समस्त शिवसैनिक, महिला आघाडी, युवा सेना, शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मोहन उगले यांनी शिवसेनेच्या वतीने करण्यात आलेल्या संपूर्ण विकास कामाबाबत माहिती दिली.

## जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालय गोवेलीच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय सुवर्ण कामगिरी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**गोवेली :** क्रीडा युवक संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नाशिक , आयोजित राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धा दिनांक १०/११/२५ ते १२/१०/२५ पल्लवी मंगल कार्यालय मनमाड येथे झाली. या स्पर्धेत जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालय, गोवेलीचा विद्यार्थी कु. सार्थक मेमाने याने ७१ किलो वजनी गटात स्नॅच ११५ किलो, क्लीन अँड जर्क १३५ किलो असे एकूण २५० किलो वजन उचलून प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण पदक पटकावले. तर कु. राहुल गायकवाड याने ९८ किलो वजनी गटात स्नॅच ७६ किलो, क्लीन अँड जर्क १०३ किलो असे एकूण १७९ किलो वजन उचलून चौथा क्रमांक मिळवला. कु.सार्थक मेमाणे या विद्यार्थ्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

### कु.सार्थक मेमाणे या विद्यार्थ्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

विद्यार्थ्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा.रविंद्र घोडविंदे व सर्व शिक्षक वृंदांनी दोघांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## डॉ.सुश्रुत वैद्य वसंतस्मृती आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** रविवार दि.९नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय जनता पार्टी शिक्षक आघाडी, कोकण विभागातर्फे वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार व गुणगौरव सोहळा पार पडला. यामध्ये कल्याणातील नामांकित बालक मंदिर संस्थेचे कार्यवाह दंत चिकित्सक डॉ.सुश्रुत भा.वैद्य यांना 'वसंत स्मृती आदर्श शिक्षण संस्था चालक पुरस्कारा'ने सन्मानीत करण्यात आले.हा पुरस्कार त्यांना महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण अंमलबजावणी समितीचे अध्यक्ष डॉ. विनयजी सहस्रबुद्धे यांचे शुभहस्ते देण्यात आला. यावेळी कोकण पदवीधर मतदार संघाचे लाडके व लोकप्रिय आमदार ॲड. निरंजन डावखरेसाहेब, आमदार श्री. संजयजी केळकर साहेब, कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार श्री. ज्ञानेश्वरजी म्हात्रे साहेब , भारतीय जनता पार्टी शिक्षक आघाडीचे पदाधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

डॉ. सुश्रुत वैद्य हे बालक मंदिर संस्थेच्या कार्यकारणीवर ९ वर्षापासून पदाधिकारी म्हणून काम करीत आहेत सध्या ते ६ वर्षापासून कार्यवाह म्हणून काम करीत आहेत. त्यांनी आपल्या सेवाकाळात आतापर्यंत अनेक कामे मार्गी लावण्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. रोटरी क्लबच्या माध्यमातून १२ लाख निधी मिळवून,त्यांनी कॅप्टन रवींद्र माधव ओक हायस्कूलधील प्रयोग शाळेचे अद्ययावत असे नूतनीकरण केले आहे. संस्थेच्या कल्याणातील मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी देखील त्यांचं अभूतपूर्व असं योगदान राहिलं आहे.तसेच संस्थेच्या चिंचले आश्रम शाळेच्या नवीन वस्तीगृहाचे बांधकाम सुरू करण्याच्या कामातही ते महत्वपूर्ण योगदान देत आहेत. त्यांनी शाळेत स्पोर्ट्स अकॅडमी सुरू केली आहे. रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणच्या अध्यक्षपदी असताना त्यांनी जवळपास १३५ शैक्षणिक व सामाजिक दर्जेदार व नाविन्यपूर्ण असे उपक्रम राबविले. रोटरी क्लबच्या माध्यमातून त्यांनी आतापर्यंत १००० दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम पाय उपलब्ध करून दिले आहेत. तसेच रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणच्या अध्यक्षपदी असतांना त्यांनी कल्याण शहरामध्ये हिंदू नववर्ष स्वागत यात्रेचेही आयोजन केले होते. तसेच जिल्हास्तरीय बाल नाट्य महोत्सवाचेही आयोजन केले होते.त्यांना सामाजिक व शैक्षणिक कार्याची प्रचंड आवड आहे, ते आपला डॉक्टरी व्यवसाय सांभाळून बालक मंदिर संस्थेसाठी व रोटरी क्लबसाठी आपलं कायम महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. कॅन्सर रुग्णांना अत्याधुनिक उपचार मिळावेत म्हणून Shaman Cancer Care हे अद्यावत कॅन्सर रुग्णालय त्यांनी चालू केले आहे. शासकीय योजनेतून अनेक कॅन्सर रुग्ण तेथे मोफत उपचार घेत आहेत. डॉ. सुश्रुत वैद्य यांचे संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून कौतुक करण्यात येत आहे.

## बिबट्याच्या वावराबाबत ग्रामस्थांमध्ये वनविभागाची जनजागृती

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील मौजे रोहण, वाहोली येथे गेले महिनाभरापासून सुरु असलेल्या रोहण वाहोली रोडवरील राखिव वनातील वाढता संचारा बाबत वनविभाग कल्याण वनरिक्षेत्र व प्राणीमित्र कल्याण डोंबिवली टिटवाळा विभाग यांच्यावतीने मौजे रोहण ता. कल्याण येथील हनुमान मंदिराच्या सभामंडपात भयभीत झालेल्या पंचक्रोशीतील ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली.



कल्याण वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश आखाडे, विशाल कंथारिया, सुहास पवार व प्राणी टिम व रिहान साहिर मोतीवाला (झूऑलॉजिस्ट, निसर्गतज्ञ) व दहागाव वनपाल मुरलीधर जागकर, वनरक्षक सुशांत निकम, मोहिनी शेळके यांच्या उपस्थित सभा घेवून या सभेत पंचक्रोशीतील स्थानिकांना तसेच ग्रामस्थांना बिबट या वन्यप्राण्यापासून आपले व आपले परिवाराचे स्वसंरक्षण कसे करता येईल या बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

बिबट या वन्यप्राण्याचे संचारा बाबत योग्यत्या उपाय योजना जसे कि, संध्याकाळी किंवा सकाळी एकटयाने बाहेर न फिरणे, बाहेर आवश्यक कामांकरीता जात असतांना दोघा तिघांत जाणे, आपले घरा सभोवतालचा परिसर साफसुथरा ठेवणे, लहान मुलांना व आपले घरातील वयस्कर माणसांना एकटे न सोडणे, रात्रौ बाहेर पडतांना काठी व विजेरी / बॅटरी चा वापर करणे, सदरचे रस्त्याने जात येत असता आपले मोबाईलवर मोठ्या आवाजात गाणी लावणे, आपले गावाचे सार्वजनिक तसेच अंतर्गत रस्त्यावर मोठे हॅलोजन /लॅम्प लावून परिसर प्रकाशमान करणे, गावातील कच-याची योग्यती विल्हेवाट लावणे, गावा जवळ कचरा न टाकणे, संध्याकाळी फटाके वाजविणे तसेच आपले ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसुरक्षा कमेटी/दल तयार करून, आपले गावात आळीपाळीने रात्रौगस्त करणे जेणेकरून बिबट हा वन्यप्राणी आपले गावाजवळ येणार नाही.

आपल्या परिसरात बिबट हा वन्यप्राणी दिसून आल्यास त्वरीत वन विभागाशी संपर्क करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या सभेस सरपंच सखाराम रोहणे, उत्तम रोहणे, ॲड. जयेश मोहिते, पुंडलिक गायकर, समाज कार्यकर्ते व ग्रामस्थ मंडळ रोहण इत्यादी उपस्थित होते.

तर ५ ते १२ नोव्हेंबर हा आठवडा पक्षी सप्ताह म्हणून साजरा केला जातो. दहागाव परिमंडळ, वनपाल जागकर यांच्या पुढाकाराने मौजे. रोहण - हनुमान मंदिर सभागृह, मौजे. रायते - पद्मश्री अण्णासाहेब जाधव महाविद्यालय, जिल्हा परिषद शाळा आपटी, जागृती महाविद्यालय दहागाव इत्यादी ग्रामपंचायत आणि शाळा - महाविद्यालयात पक्षी सप्ताह साजरा करण्यात आला. याप्रसंगी कल्याण वनपरिक्षेत्रक अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थीत होते.

## माजी नगरसेवक प्रदीप राका यांना मातृशोक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर महानगर पालिकेचे माजी नगरसेवक प्रदिप राका यांच्या आई श्रीमती शांताबाई वालचंद राका ( वय - 93) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने उपचारा दरम्यान दुःखद निधन झाले आहे .त्यामुळे शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.गेल्या काही दिवसापासून त्यांची तब्येत बरी नसल्याने उपचार सुरू होते मात्र काल बुधवारी सकाळी त्यांची तब्येत बिघडल्याने शहरातील खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले मात्र उपचारा दरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या पश्चात एक मुलगा व मुली जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे.



भिवंडी शहरातील अजय नगर रोडवरील शहरातील हिंदू चिरशांती स्मशानभूमीमध्ये शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी शहरातील मान्यवर नागरीक व आमदार महेश चौघुले,माजी आमदार रशिद ताहीर मोमीन,माजी महापौर विलास पाटील, जावेद दळवी यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी,माजी नगरसेवक उपस्थित होते. उदया (दि.14 ) रोजी शुक्रवार सकाळी-10:30 ते दुपारी 1:30 वा.दरम्यान शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील स्वामी नारायण मंदिर सभागृहा भावयात्रा (श्रध्दांजली) कार्यक्रम होणार आहे.

## कल्याण स्थानकावर 18 नोव्हेंबर पासून मीटरप्रमाणे रिक्षा वाहतूक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कल्याण (पश्चिम) रेल्वे स्टेशन येथे मोटरप्रमाणे रिक्षा वाहतूक (पहिला टप्पा) दि.18 नोव्हेंबर 2025 पासून सुरु करण्यात येत आहे. याबाबत कल्याण (पश्चिम) या विभागातील ऑटोरिक्षा संघटना यांना कळविण्यात येते की, दि.18 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी 11.00 वाजता वरील नमुद ठिकाणी आपल्या ऑटोरिक्षा संघटनाचे पदाधिकारी तसेच संघटनाचे सभासद यांनी उपस्थित राहून सहकार्य करावे तसेच जास्तीत जास्त प्रवाशांना मीटरप्रमाणे रिक्षा प्रवास करण्याबाबत प्रोत्साहित करावे, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण, आशुतोष बारकुल यांनी कळविले आहे.

## कमी मार्क मिळाल्याने आठवीतल्या विद्यार्थिनीची आत्महत्या

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण येथे घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेत आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने 19व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. गुरुवारी दुपारी ही घटना घडली. पोलिसांच्या माहितीनुसार, 14 वर्षीय विद्यार्थिनीने शाळेतील ओपन डे दरम्यान कमी गुण मिळाल्यामुळे नैराश्य आले होते. ती आपल्या 20 वर्षीय बहिणीसोबत शाळेत गेली होती. घरी परतल्यानंतर ती मानसिक तणावाखाली होती आणि तिने घराच्या बाल्कनीतून उडी घेत आपले जीवन संपवले. त्यावेळी तिची आजी आणि मोठी बहीण घरी होत्या, तर तिची आई नोकरीसाठी बाहेर गेली होती. खडकपाडा पोलिसांनी या घटनेची चौकशी सुरू केली असून प्राथमिक तपासात शिक्षणातील ताण हा आत्महत्येचा संभाव्य कारण असल्याचे समोर आले आहे.

## दागिने खरेदीच्या बहाण्याने चोरी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** दागिने खरेदीच्या बहाण्याने ४० ते ६० वर्षीय तीन महिलांनी खोपट येथील सराफाच्या दुकानातून एक लाख दोन हजारांच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी केली. याप्रकरणी तीन अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याची माहिती नौपाडा पोलिसांनी बुधवारी दिली.

खोपट येथील हंसनगर भागात रवींद्र सरफळे (वय ५०) यांचे 'श्री शिवसमर्थ ज्वेलर्स' दुकान आहे. १ नोव्हेंबरला त्यांच्या दुकानात शिरलेल्या अनोळखी महिलांनी सोन्याच्या पिना खरेदी करण्याच्या बहाण्याने चोरी केली.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024